REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांच्या सुधारणा विषयीविचार कार्य

प्रा.डॉ. संजय संभाजी लांडगे
मराठी विभाग प्रमुख, ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.

## स्त्रियांसाठी आर्थिक समानता :-

पुरुष आणि स्त्रियांच्या आर्थिक विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानतेची स्थापना केली. स्त्री, पुरुषांना धर्म, दीक्षा, समन्वय, अध्ययनाचे स्वातंत्र्य असलेल्या बौध्द धर्माकडे बाबासाहेब आकर्षित झाले. तसेच शिक्षण व आत्मविकासाच्या दृष्टीने पुरूष व स्त्री असा कोणताही भेदभाव करता येणार नाही, या तत्वाच्या आधारामुळे बाबासाहेब बौध्दधर्माकडे आकर्षित झाले.

## स्त्रियांच्या खरेदी-विक्री प्रक्रियेला विरोध :-

स्त्रिया स्वावलंबी असले पाहिजेत, या मताचे बाबासाहेब होते. स्त्रियांच्या खरेदी-विक्री प्रथेला तसेच गुणहीन पतीची स्त्रीने पुजा करावी व गुणहीन पती तिचे पालन करण्याऐवजी तिची केवळ उपेक्षा करतो, याला बाबासाहेबांचा तीव्र विरोध होता. बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजातील स्त्रियांची किती प्रगती झाली यावरुन ठरविता येते. त्याच्या आधारे राष्ट्राची प्रगती अवलंबून असल्याचे मान्य केले आहे.

## स्त्रीशक्तीचे एकत्रीकरण :-

स्त्रियांच्या आर्थिक कल्याणासाठी व राष्ट्रीय आर्थिक विकासात त्यांच्या भागीदारीसाठी स्त्रीशक्ती संघटित होणे गरजेचे आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानत असत. यामुळे त्यांनी आर्थिक कल्याणासाठी महिलांचे नेतृत्व विकसित केले. शांताबाई दाणी, गीताबाई गायकवाड तसेच श्रीमती मनोबल शिवराज यांना महिलांच्या आंदोलनात सहभागी करून घेतले. महिलांसाठी स्त्रीशिक्षण अत्यावश्यक करून महिलांची आर्थिक क्षेत्रातील भागिदारी वाढविण्यासाठी व भारतात समानता आणण्यासाठी बाबासाहेबांनी बालविवाह प्रथेचा विरोध केला. कुटुंब मर्यादित ठेवण्याच्या बाबतीत त्यांचे ठाममत होते. कौटुंबिक अर्थव्यवस्थेची कल्पना प्रत्येक राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला समग्र रूप देऊ शकते. म्हणून कौटुंबिक अर्थव्यवस्था विकसित करणे अत्यावश्यक आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते जोपर्यंत स्त्रियांना आर्थिक स्वावलंबनाची संधी दिली जात नाही, तोपर्यंत समाजसुधारणांचे कार्यक्रम दिखावू आहेत. ४०० वर्षांची गुलामगिरी असूनही भारतीय समाजात स्त्रियांनी केलेल्या त्यागामुळेच कला, कौशल्य, कुटिरोद्योग आज अस्तित्वात आहेत.



## भारतीय संविधानात स्त्रियांसाठी रोजगार व समान संधी :-

बाबासाहेबांनी भारतीय संविधानात स्त्रियांसाठी व पुरूषांसाठी समान स्वातंत्र्य व अधिकार दिले आहेत. रोजगार व आर्थिक आधारे कोणताही भेदभाव न करण्याचा उल्लेख केला आहे. समानतेचा अधिकार देताना डॉ. आंबेडकरांनी वेठबिगार प्रथेला कडाडून विरोध केला. आंबेडकरांच्या मते भारतीय समाजातील शोषण व दारिद्र्य यांचे मुळ वेठबिगारी प्रथेत आहे.

## हिंदू कोड बिल :-

स्त्रियांना विवाह व संपत्तीच्या संदर्भातील कायद्यात बदल करण्यासाठी बाबासाहेबांनी हिंदू कौटूबिक संपत्तीत समान अधिकार देण्याची शिफारस केली. त्यांनी स्त्रियांना मूलदत्तक घेण्याचा अधिकार दिला. डॉ. आंबेडकरांनी मांडलेले हिंदू कोड बील लागू करु इच्छित होते. परंतु ते ज्या स्वरुपात हिंदू कोड बील लागू करु इच्छित होते, ज्यामुळे घटस्फोट, वैधव्य आदि परिस्थितीमध्ये महिलांचे शोषण होणार नाही व आर्थिकदृष्ट्या त्यांना परावलंबी व्हावे लागले नसते. परंतु हिंदू कोड बिल योग्यप्रकारे मंजूर न केल्याने ह्या महामानवाने आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

## समानता, स्वातंत्र्याचा प्रणेता :-

बाबासाहेबांनी स्त्रियांना मानव संपत्तीच्या निर्मितीच्या कुशल प्रणेता मानले आहे. राष्ट्राची शक्ती, समृध्दी जर उत्पादन, व्यापार व उद्योगाशी निगडित असेल तर त्याचा संयोजक बुध्दीमान, साहसी व व्यापारी असतात. त्यांच्यात साहस, चातुर्य, तत्परता हे गुण स्त्रियांमुळेच निर्माण होता. मानवपुंजी निर्मितीत स्त्रियांचे योगदान महत्वपूर्ण आहे. समाजात गतिशील व कष्टाळू युवाशक्ती निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य स्त्रीशक्तीमुळेच शक्य आहे. देशात भौतिक साधनांची रेलचेल कितीही असो, कुशल मानवसंपत्ती खेरीज देशाचा आर्थिक विकास अशक्य आहे. शेती, जी आज आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे, त्या शेतीच्या विकासाअभावी औद्यागिक विकासाची उंची गाठणेही शक्य नाही. विज्ञानातील ही प्रगती स्त्रियांची देणगी आहे. कुटिरोद्योग, कला, कौशल्याचा विकास हा स्त्रियांनीच केला. बाबासाहेबांनी कृषी, उद्योग, व्यापार, मनोरंजन, क्लब, इमारत, रस्ते, बांधकाम, हॉटेल, शिक्षण संस्थामधुन हलकी कामे करणाऱ्या स्त्रियांच्या हिन अवस्थेचा अंदाज केला. तसेच स्वातंत्र्यापुर्वी व स्वातंत्र्यानंतर सामाजिक स्तरावर घटना व कायद्याच्या चौकटीत स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

आज स्त्रियांच्या स्थितीमध्ये अमूलाग्र परिवर्तन होऊ शकले ते केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच. देशाच्या आर्थिक उन्नतीकरिता डॉ. आंबेडकरांनंतर विशेष प्रयत्न झालेले नाहीत. बाबासाहेबांनी १९२०-३० च्या दशकात स्त्रियांसाठी पुढाकार घेऊन स्त्रियांमध्ये जागृती निर्माण केली. बाबासाहेबांच्या या विचारांचा केवळ दलित स्त्रियांवरच नव्हे तर एकंदरीत भारतातील सर्व स्त्रियांवर व त्यांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाला, असे म्हणता येईल.

## समारोप :-

दलित समाजातील दलितांच्या सामाजिकतेचे, संस्कृतीचे, इतिहासाचे शिक्षणाचे आणि नैतिकतेचे, दर्शन होते. दलित आत्मकथनांतील बहुतांश स्त्रिया या निरक्षर, दारिद्र्यरेषेखालील, अर्थिकदृष्ट्या मागासलेल्या, सामाजिकदृष्ट्या नाकारलेल्या, झिडकारलेल्या, मान, सन्मान, प्रतिष्ठा, स्वातंत्र्यापासून वंचित ठेवलेल्या अशा आहेत. पुरूषी संस्कृतीने तिचे अस्तित्व हिरावून घेतले आहे. तिच्या या बिकट अवस्थेला क्रुर, रानटी, पारंपारिक संस्कृती जबाबदार असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने या स्त्रिया विद्रोह करताना, शिक्षण घेताना व सामाजिक प्रगती करताना दिसतात. दलित आत्मकथनांच्या माध्यमातून दलित स्त्रियांचा व्यक्त झालेला विविध रूपांचा अभ्यास मांडला आहे.

## निष्कर्ष :-

१) पुरुषप्रधान संस्कृतीने आपला स्वार्थ साधण्यासाठी स्त्रियांना विशेषकरून दलित स्त्रियांना त्यांच्या हक्क व अधिकारांपासन वंचित ठेवल्याचे दिसून येते.
२) पुरुषप्रधान संस्कृतीमुळे दलित स्त्रिच्या वाट्याला 'स्त्री' त्वाचे आणि दलितत्वाचे दुहेरी दुखणे आल्याचे दिसते. तरीसुध्दा आपल्या कुटुंबासाठी वाटेल ते कष्ट घेताना दिसतात.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांने प्रभावित होऊन बहुतांश स्त्रियांचे आत्मभान जागृत होऊन विद्रोह करताना, शिक्षण घेताना, प्रगती करताना दिसतात.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या संदेशाचे पालन करुन दलित स्त्रिया सामाजिक प्रगती करताना दिसतात.
५) दलित स्त्रियांची बंडखोरी प्रामुख्याने ती समाजातील अनिष्ठ प्रवृत्ती विरोधातली असल्याचे दिसून येते.
६) दलित स्त्रियां स्वसुखापेक्षा कुटुंबाच्या सुखाचा विचार करताना दिसतात.
७) आगतिकता, दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव यातून दलित स्त्रियांच्या स्वभावाचे विविध प्रकार आढळतात.

## संदर्भग्रंथ :-

१) कांबळे शांताबाई- माझ्या जन्माची चित्तरकथा, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०, पृष्ठ क्र. ७६.
२) पवार उर्मिला- आयदान ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००३, पृष्ठ क्र. २०२.
३) सोनकांबळे प्र.ई.- आठवणीचे पक्षी- चेतना प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृष्ठ क्र. ६९.
४) पवार दया- बलुतं, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र. ५.
५) लिंबाळे शरणकुमार- अक्करमाशी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ क्र. ५२.

LBP PUBLICATION